# <u>सातारा जिल्हा न्यायालयीन कर्मचारी सह. पतसंस्था मर्या. सातारा</u>

## **<u>परिपत्रक</u>**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, संस्थेच्या मा. संचालक मंडळ मासिक सभा दि.०८/०१/२०२३ मधील ठराव क्र.०७ नुसार **<u>माहे जानेवारी २०२३</u>** पासून संस्थेची मध्यम मुदत कर्ज वाटपाबाबतचे नवीन धोरण ठरविणेत आले आहे.

**१) <u>मध्यम मुदत कर्ज रक्कम हप्ते परतफेड खालीलप्रमाणे राहील.</u>**

| कर्ज रक्कम | परतीचे हप्ते | मसिक हप्ता | व्याज ६% | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ८५०००० | ११४ | ७५०० | ४२५० | ११७५० |
| ८००००० | ११२ | ७२०० | ४००० | ११२०० |
| ७००००० | ११० | ६४०० | ३५०० | ९९०० |
| ६००००० | १०० | ६००० | ३००० | ९००० |
| ५००००० | १०० | ५००० | २५०० | ७५०० |
| ४००००० | १०० | ४००० | २००० | ६००० |
| ३००००० | ८६ | ३५०० | १५०० | ५००० |
| २००००० | ६७ | ३००० | १००० | ४००० |
| १००००० | ४० | २५०० | ५०० | ३००० |

**मध्यम मुदत कर्ज अर्जासोबत सभासदांनी <u>मासिक वेतन प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे</u>.**

२) **<u>कर्ज नुतणीकरण सुविधा</u> :-** आर्थिक अडचणीत असणारे सभासदांना पतपुरवठा करता यावा म्हणून सदरचे धोरण ठरविणेत आले असुन याबाबतचा पोटनियम फ-१.१० ७ड अस्तीत्वात आहे. तरी, **घेतलेले कर्जाची ५० टक्के वसुली झाली असलेस सभासद कर्ज नुतणीकरणास पात्र राहील. परंतु पुर्ण परतफेड झालेले सभासदांचे अर्जांना प्राधान्य राहील.** नुतणीकरण अर्जाची प्रतिक्षा यादी वेगळी करणेत येईल, तरी सभासदांना विनंती की, अपवादत्मक परिस्थितीतच नुतणीकरणाचे अर्ज पाठवावेत.

सर्व सभासदांना विनंती करणेत येते की, **<u>जामीनदार म्हणून सही करताना आपण यापूर्वी किती सभासदांना जामीन आहोत याची खात्री करावी. तसेच कर्ज अर्ज देणारे सभासदांना विनंती करणेत येते की, आपले जामीनदार सभासद हे यापूर्वी २ पेक्षा जास्त कर्जदारांना जामीनदार आहेत किंवा नाही, याबाबत खात्री करावी</u>**

३) मध्यम मुदत कर्ज मंजूर करताना **<u>सभासदत्वास १ वर्ष पूर्ण असणा-यास १,००,०००/-, २ वर्ष पूर्ण असल्यास २,५०,०००/ (तसेच ३,००,०००/- पेक्षा जास्त ते ५,००,०००/-पर्यंत कर्ज घेणा-या सभासदाची शेअर्स कपात १५% ने करणेत येईल ) ३ वर्ष पूर्ण असल्यास ६,००,०००/- ते ८,५०,०००/- कर्ज मंजूर करणेत येईल तथापी ३ वर्ष व तदनंतर प्रथम वेळी कर्ज सुविधा घेणा-या सभासदाची शेअर्स जेवढे कर्ज घ ेणार आहेत त्याच्या १५% शेअर्स नसतील तर त्यांच्या कर्जातून शेअर्स कपात १५% ने करणेत येईल. तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.</u>**